Ex. 18 D  कि. दि. अर्ज नं.२५/२०२६

मे. प्रमुख जिल्हा न्यायाधिशसो, कोल्हापूर

यांचे न्यायालयात

प्रसाद बाबासो लबाजे — अर्जदार

विरुध्द

रघुनाथ राघो पाटील — वि.प.

Filed
PDJKP
17-3-26

यातील वि.प. नं.३ ते ६ तर्फे दाखल कागदपत्रांची यादी खालील प्रमाणे—

| अ. क्र. | कागदाचे वर्णन | तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एफ.आय.आर. नं.९८/२०२५ | २४/०३/२०२५ | झेरॉक्स |
| २ | सहाय्यक निबंधक सह. संस्था यांचा अहवाल | २१/०१/२०२५ | झेरॉक्स |
| ३ | बाळगोंडा आण्णा पाटील यांचा रिमांड रिपोर्ट | १२/१२/२०२५ | झेरॉक्स |

येणेप्रमाणे तीन (३) कागद हजर केले असे.

(Adv for opp No 3 to 6)

कोल्हापूर

दि.१७/०३/२०२६

अ नं (1)

# FIRST INFORMATION REPORT

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गोकुळ-शिरगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0098 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2025 18:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 108 |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 351(1) |
| 3 | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, 2014 | 39 |
| 4 | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, 2014 | 45 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Date From (दिनांक पासून):** 24/03/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 3
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2025
   **Time From (वेळेपासून):** 09:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 09:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/03/2025 **Time (वेळ):** 18:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2025 18:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 8 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हलसवडे,ताकरवीर जि कोल्हापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

सहा.पोलीस निरीक्षक गो.शि.एम.आय.डी.सी.,पो.ठाणे,जि.कोल्हापूर

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आकाश नागोंडा पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हलसवडे ताकरवीर जि कोल्हापुर,गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हलसवडे ताकरवीर जि कोल्हापुर,गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9503379090

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबासो पारीसा लबाजे | | | 1. कसबा सांगाव ताकागल जि कोल्हाप,गोकुळ-शिरगांव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मधु मगदुम बसाना | | | 1. पिंपळगाव ताकागल जि कोल्हापुर,गोकुळ-शिरगांव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जबाब ता. 24 .03.2025.

मी आकाश नागोंडा पाटील .वय.26.व्यवसाय. खाजगीनोकरी रा.हलसवडे ता.करवीर जि कोल्हापुर मोबाईल नं.9503379090 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि ,

मी वरील ठिकाणी आई अंजना व मयत वडिल , भाऊ आदर्श वहिनी सुप्रिया व आजोबा शंकर बाळगोंडा पाटील , व आजी निलाबाई याचे सह रहाणेस आहे .मी कोल्हापुर प्राईम इस्टेट मध्ये सिव्हील इंजिनिअर म्हणुन काम करतो. वडिल हे शेती करीत होते.त्यावरच आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असतो.

हलसवडे येथे गट नं.652 अ] क्षेत्र 2 हेक्टर 06.आर पोट खराब हेक्टर 0-11 आर पैकी क्षेत्र हेक्टर 0-18.96 हि सुमारे 19 गुंठे इतकी शेती असुन ती माझे वडिल नागोंडा शंकर पाटील याचे नांवावर होती.वडिल हे स्वत शेती करीत होते.

माझे वडिल नागोंडा शंकर पाटील यानी जुलै 2022 मध्ये पाच लाख रुपयाची गरज होती म्हणुन गावातील बाळगोंडा आण्णासो पाटील याचे ओळखीने बाबासो पारीसा लंबाजे याचेकडे दरमहा दोन टक्केने कर्ज घेतले असल्याचे वडिलानी मला सागितलेवर माहित होते. त्या रक्कमेला सेक्युरिटी म्हणुन गहाण खत ता. 27.7.2022 रोजी वर नमुद जमीनीचे बाबासो पारीसा लबाजें याचे नांवावर केलेचे दाखविले व सदर व्यवहार बाबत माझे वडिलानी मला माहिती सागितली होती.त्यावेळेस दरमहा दोन टक्के व्याजाने पैसे भागवले कि जमीनीचा उलट कागद करुन देतो असे ठरले असल्याचे सागितले होते.सदर बाबासो पारीसा लबाजे हा बेकायदेशीर पणे सावकारीचा व्यवसाय करीत असल्याचे माहित होते.

दरम्यान ता.14.12.2023 रोजी वडिल नागोंडा हे मुददल कर्ज व व्याज असे रुपये 6,60,000 रुपये बाबासो लबाजे याना देणेस कागल येथील त्याचे घरी जात असताना तेथे काय बोलणे होते याबाबत मला फोन करुन तेथील बोलणे ऐकायचे आहे असे सागितले होते त्याप्रमाणे वडिलानी तेथे गेलेवर मला फोन लावला होता त्यावेळी मला मोबाईल वरुन बाबासो हे दरमहा चार टक्के व्याज व दर तीन महिन्याचे व्याज मुददलामध्ये जमा असे हिशोब धरुन एकुण 29 लाख रुपयेची मागणी करीत असल्याचे ऐकु आले व वडिलानी देखील आलेवर मला त्या प्रमाणेच सागितले.ते वडिलाचे मोबाईल मध्ये सेव्ह होते.

बाबासो लबाजे याचे व वडिलामध्ये बाळगोंडा आण्णासो पाटील हे मध्यस्थी होते. बाबासो लबाजे हे ज्यादा व्याज मागत असल्याचे व बाळगोडा देखील देणेस सांगत असल्याचे वडिलानी सागितले होते.त्याबाबत वडिलानी ता. 29.2.2024 रोजी पोलिस अधिक्षक सो याचे कडे खाजगी सावकारी व फसवणुकीचा लेखी तक्रारी अर्ज केला होता.त्यावेळी पोलिसानी जिल्हा उप निबधक सहकारी संस्था कडे तक्रार दाखल करणेसाठी सागितले होते. त्याप्रमाणे ता.26.3.2024 रोजी जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था कोल्हापुर याचे कडे खाजगी सावकारी व फसवणुकीचे अनुषगाने तक्रारी अर्ज वडिलानी केला होता.सदर बाबत चौकशी होवुन ता.21.1.2025 रोजी बाबासाे लबाजे हे विनापरवाना अवैदय सावकारीचा व्यवहार करतात असा अहवाल आला.

दरम्यान ता .11.12.2024 रोजी बाबासाे लबाजे व बाळगोडा पाटील यानी दि.22.7.2022 चे फसवुन केलेला दुय्यम निबधक कार्यालय कोल्हापुर येथील कागद रदद करावा म्हणुन वडिल नागोंडा पाटील यानी दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर येथे दिवाणी दावा स्पेशल क.जा.नं.585/2024 ने दाखल केला तो न्याय प्रविष्ठ आहे.

दरम्यान बाबासो लंबाजे यानी आमचे दाव्यामध्ये खाजगी सावकारीची बदनामी केली म्हणुन दहा



सहा.पोलीस निरीक्षक
गो.शि.एल.आय.डी.सी.पो.ठाणे जि.कोल्हापूर

लाख रुपये नुकसान भरपाई मागणीचा खोटा प्रति दावा ता.7.3.2025 रोजी केला आहे.तसेच 100/2024 ता. 12.1.2024 रोजी बाबासा◌ो लंबाजे यानी जमीनीतील ऊस नागोडा पाटील याचे नांवे गेला होता त्याचे बिल मिळावे म्हणुन दावा दाखल केला होता. ती केस न्याय प्रविष्ठ आहे.

सदर सावकार बाबासा◌ो लंबाजे हे व्याजाची रक्कम वसुल करणेसाठी भेटेल तेथे धमकी देत असल्याचे व त्रास देत असल्याचे वडिलानी मला सागितले त्यामुळे घाबरुन बाहेर देखील जावेसे वाटत नाही व जगणे देखील नकोसे झालेचे व त्याचे त्रासास कट◌ाळलो जीवाचे काहीतरी बरेवाईट करुन घ्यावे असे वाटत असल्याचे सागितले त्यावेळी मी व आई अंजना यानी मिळुन वडिलास असे काही करु नका असे समजावुन सागितले होते.

ता.22.3.2025 रोजी बाळगोंडा अण्णा पाटील यानी येवुन बाबासो लबाजे हे रान नांगर करणार असल्याचे सांगुन तुला काय करायचे ते कर असे म्हणाला होता.

काल तारीख.23.3.2024 रोजी रात्रौ.09.30 वा चे सुमारास टॅक्टर हा शेड ठिकाणी लावुन वडिल हे गेले होते.ते रात्रौ.घरी आले नाही त्यामुळे भाऊ राहुल व मी असेनी मिळुन आमचे मळयाचे ठिकाणी रात्रौ. 12.00 ते 12.30 पर्यत शोध केला होता .परंतु वडिल दिसले नाही.

आज ता.24.3.2025 रोजी चुलत भाऊ राहुल सुभाष पाटील हा दुसरेचे शेती करीत असुन तो तेथे पाणी चालु करणेसाठी सकाळी 09.00 वा गेला असता तेथे महादेव व राजगौंडा पाटील याचे शेतातील बांधावरील झाडयास माझे वडिल नागोंडा पाटील हे गळफास लावुन घेतले◌ले अवस्थेत दिसलेचे सागितलेने मी व घरातील इतर जण गेलो तेथे वडिल नागोंडा पाटील हे गळफास लागलेले स्थितीत मयत दिसले त्याचे प्रेत हे खाली काढले .पोलिसात खबर देण्यात आली पोलिसानी येवुन पाहणी केली सदर ठिकाणी वडिलाचे जवळ चिठठी सापडली त्यामध्ये मी नागोंडा पाटील आत्महत्या कारण श्री.बाबासो पारीस लंबाटे रा.सांगाव यानी माझी शेती नांवावर करुन घेतला आहे म्हणुन मी व मला मारण्याची धमकी देत आहोत तरी माझी जमीन माझ्या मुलान◌ा तरी परत कराव.मधु मगदुम बसाना रा.पिपंळगाव यानी 2,50,000 रुपये घेवुन मला बुडविले आहे .अशी जुने कागदावर मजकुर लिहिलेली चिठठी त्यावर तारीख व सही नसलेली मिळाली आहे .सदरचे हस्ताक्षर हे वडिलाचे आहेत हे मला माहित आहे. वडिलाचे प्रेत हे पोष्टमार्टम साठी सी.पी.आर हॉस्पीटल येथे पाठविले आहे.

सदर मधुकर मगदुम यानी सन 2015 मध्ये माझे वडिलाकडुन हातउसने रक्कम घेतली होती ती रक्कम वेळोवेळी अडचणीचे वेळी मागुन देखाल दिला नसल्याने वडिलांनी त्याचे नांव चिठठी मध्ये लिहिले आहे.

माझे वडिल नागोडा शंकर पाटील वय.52.यानी बाबासा◌ो पारीसा लबाजे या बेकायदेशीर सावकारी करणारा सावकार याचे व मधु मगदुम बसाना या लोकांचे त्रासास कटांळुनच ता.24.3.2025 रोजी सकाळी 9.00 वा पुर्वी केव्हातरी राजगोंडा व महादेव पाटील याचे शेतातील बांधावरील झाडास नॉयलान दोरीचे साहयाने गळफास लावुन घेतल्याने ते मयत झाले आहेत म्हणुन बाबासा◌ो पारीसा लबाजे.रा.कसबा सांगाव ता. कागल जि कोल्हापुर ,मधु मगदुम बसाना .रा.पिपंळगाव ता.कागल जि कोल्हापुर याचे विरुध्द तक्रार आहे .

माझा फिर्यादी जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर लिहिलेला आहे

समक्ष हा फिर्यादी जबाब लिहुन दिला स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
A Patil.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

तबस्सूम जे मगदूम
सहा.पोलीस निरीक्षक

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): tabassum jamal ma(
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

★ सहा.पोलीस निरीक्षक ★ गो.शि.एम.आय.डी.सी., पो.ठाणे, जि.कोल्हापूर

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.करवीर, जि.कोल्हापूर
कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती कोल्हापूर, प्लॉट नं.एम.१५ जी, हॉल नं.१, एस.बी.आय.बँक रोड, कोल्हापूर.
फोन नं. - ०२३१/२६४१२४५ E- mail- arcskarvir@gmail.com

जा.क्र.कक्ष-४/सावकारी/नागोंडा पाटील/अहवाल/सन २०२५. 3802 दि.29/०१/२०२५

प्रति,
मा.जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर.

**विषय :- खाजगी सावकारकीबाबत कारवाई करणेकरीता व फसवणूकीचा गुन्हा दाखल करणेबाबत...**

संदर्भ :- १. आपले कार्यालयाकडील जा.क्र.जिउनिको/कक्ष १४/सावकारी तक्रार अर्ज/१२८/२०२४ दि.१०/०४/२०२४ रोजीचे या कार्यालयास दि.२०/५/२०२४ रोजी प्राप्त पत्र.
२. या कार्यालयाकडील जा.क्र.सनिक/कक्ष-२/सावकारी तक्रार/श्री.पाटील/२०२४ दि.०६/०६/२०२४ रोजीचे पत्र.
३. या कार्यालयाकडील जा.क्र.सनिक/कक्ष-२/सावकारी तक्रार/चौकशी/२०२४ दि.१२/०७/२०२४ रोजीची नोटीस.
४. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम,२०१४ चे कलम १६.

कृपया वरील विषय व संदर्भ पहावा,

आपले कार्यालयाकडील संदर्भ क्र.१ मधील पत्रासोबत श्री.नागोंडा शंकर पाटील रा.हलसवडे, ता.करवीर यांचेकडील दि.२६/०३/२०२४ रोजीचा तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अर्जाने श्री.नागोंडा पाटील यांनी श्री.बाबासो पारीसा लबाजे रा.कसबा सांगाव, ता.कागल व श्री.बाळगोंडा आण्णा पाटील रा.हलसवडे, ता.करवीर यांचेविरुध्द खाजगी सावकारी व फसवणूकीबाबत तक्रार केली आहे. श्री.नागोंडा पाटील यांचे तक्रार अर्जात खालीलप्रमाणे मुद्दे नमुद करणेत आले आहेत.

**अर्जदार यांचे तक्रार अर्जातील मुद्दे :-**

१. अर्जदार हे मौजे हलसवडे, ता.करवीर येथील रहिवासी आहेत.
२. मौजे हलसवडे येथे त्यांची वडिलोपार्जित एकूण २-१७ आर पैकी त्यांचे स्वतःचे मालकीची ०-१८.९६ शेतजमीन आहे.
३. माहे जुलै २०२२ मध्ये अर्जदार यांना रु.५ लाखाची आवश्यकता असलेने ते गैरअर्जदार क्र.२ श्री.बाळगोंडा आण्णा पाटील यांचे सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र.१ श्री.बाबासो पारीसा लबाजे, खाजगी सावकार यांना भेटण्याचे ठरले.
४. अर्जदार हे गैरअर्जदार क्र.२ यांचेसोबत गैरअर्जदार क्र.१ यांना भेटणेसाठी कागल येथे गेले असता गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार यांना रु.५ लाख २ टक्के व्याजदराने देणेचे मान्य व कबूल केले व जमिनीचा खरेदी कागद रक्कमा नमुद करुन करावा लागेल, आणि अर्जदार यांचेकडे पैसे उपलब्ध झालेनंतर दरमहा २ टक्के व्याजासह रक्कम भागवून अर्जदार यांचे नावे खरेदीपत्र करुन देणेचे सांगीतले. तसेच जमिनीचा ताबा अर्जदार यांचेकडे राहणार व पिके अर्जदार घेणार, असे गैरअर्जदार क्र.२ यांनी सांगीतले.
५. त्यानुसार रजि.दस्त नं.५३६९ चे खरेदीपत्र ता.२७/०७/२०२२ रोजी केलेचे दर्शविले. खरेदीपत्रावेळी गैरअर्जदार क्र.२ यांनी अर्जदार यांना रु.३ लाख चेकने व रु.२ लाख रोख असे एकूण रु.५ लाख दिले. दि.१३/०६/२०२२ रोजी अर्जदार यांना कोणतीही रक्कम दिलेली नसून रु.२ लाख हे खरेदीपत्राचे खर्चाकरीता वापरले असे गैरअर्जदार यांनी सांगीतले आहे.

(2)

६. अर्जदार यांनी जमिनीत मशागत चालू ठेवली व ऊस पीक घेतले. सदर ऊस श्री.शाहू सहकारी साखर कारखाना यांना दि.०७/१२/२०२३ व दि.०८/१२/२०२३ रोजी पुरवला.

७. माहे सप्टेंबर २०२३ मध्ये रु.५ लाख कर्ज व १४ महिन्यांचे व्याज रु.१ लाख ४० हजार अशी एकूण रु.६ लाख ४० हजार एवढी रक्कम पूर्ण फेड करुन घ्या व माझी जमीन माझे नावे करुन द्या, असे अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना सांगीतले. परंतु, गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी दरमहा ४ टक्के व्याज पाहिजे, असे सांगीतले.

८. त्यानंतर अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना भेटून विषय संपवणेबाबत विनंती केली. परंतु, त्यांनी दरमहा ४ टक्के व्याज तसेच दर ३ महिन्यांचे व्याज मुद्दलात जमा असे सांगून चक्रवाढ व्याज लावून रु.२९ लाख अशी प्रचंड रक्कम मागणी करु लागले अन्यथा जमीनीचा ताबा घेणार म्हणून धमकावू लागले. सदर चर्चेचे रेकॉर्डिंग अर्जदार यांनी मोबाईल मध्ये केले आहे.

९. गैरअर्जदार क्र.१ यांचेवर अनेक केसेस असून ते अर्जदार यांना फसवत असल्याचे स्पष्ट झाले आहे. गैरअर्जदार क्र.१ यांचेकडे खाजगी सावकारीचे कोणतेही लायसन्स नाही. ते परवानाधारक खाजगी सावकार नाही.

१०. गैरअर्जदार क्र.१ व २ यांचेकडून अर्जदार यांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे.

अर्जदार यांनी वरीलप्रमाणे कथन त्यांचे अर्जात नमुद केले आहे.

वरील अर्जाचे अनुषंगाने गैरअर्जदार यांचेविरुध्दचे अवैध सावकारीच्या व्यवहाराबाबतचे पुरावे सादर करणेसाठी अर्जदार यांना दि.१३/०६/२०२४ रोजी या कार्यालयात उपस्थित राहणेस संदर्भ क्र.२ मधील पत्राने कळविणेत आले होते. त्यानुसार अर्जदार यांनी उपस्थित राहून त्यांचे अधिकचे म्हणणे, Sandisk कंपनीचा पेन ड्राईव्ह व त्यामधील पुराव्यांच्या छायांकीत प्रती सादर केल्या आहेत. तसेच श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.कागल यांचेकडील ऊस बिल पावती व ऊसाची करार पावती सादर केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र.३ चे सुनावणी नोटीसने दि.२५/०६/२०२४, दि.२५/०७/२०२४, दि.३०/०७/२०२४, दि.१२/०८/२०२४, दि.२६/०८/२०२४, दि.०२/०९/२०२४, दि.१८/०९/२०२४, दि.०१/१०/२०२४, दि.०७/१०/२०२४, दि.१०/१०/२०२४ इ. रोजी सुनावणी घेणेत आली. सुनावणी दरम्यान श्री.पांडूरंग भिकाजी चव्हाण, रा.कसबा सांगाव, ता.कागल यांनी समक्ष उपस्थित राहून गैरअर्जदार क्र.१ श्री.बाबासो पारीसा लबाजे हे खाजगी सावकारी करीत असलेबाबत तक्रार केली. सौ.लबाजे यांनी श्री.पांडूरंग चव्हाण यांचे जमीन रजिस्टर खरेदी खत केले असून सदर खरेदी पूर्ण करणेबाबत सौ.लबाजे यांनी दिवाणी न्यायालय, कोल्हापूर येथे दावा क्र.१३२०/२०२० दाखल केला असल्याचे सांगीतले.

यातील जाबदार क्र.१ व क्र.२ यांचेवतीने ॲड.श्री.अभिजीत जयंत देशपांडे यांनी वकिलपत्र दाखल केले आहे व त्यांचेवतीने दि.२६/०८/२०२४ रोजी खालीलप्रमाणे लेखी म्हणणे सादर केले.

**<u>जाबदार क्र.१ व क्र.२ यांचेवतीने लेखी म्हणणे :-</u>**

' अर्जदार यांचा संबंधित मिळकतीशी सध्या कोणत्याही प्रकारे मालकी अथवा हक्क संबंध राहिला नसून त्याची कोणतीही कब्जे वहीवाट सध्या सुरु नाही. अर्जदार यांनी सदर मिळकत ही नोंदणीकृत दस्त क्र.५३६९/२०२२ ने दि.२८/०७/२०२२ रोजी रितसर जाबदार क्र.१ यांचे लाभात सक्षम अधिकारी यांचेसमोर खरेदी दिली आहे व त्याचा कब्जाही त्याच दिवशी देण्यात आला आहे. जाबदार क्र.१ यांनी सदर मिळकतीमध्ये खोडवा ऊसाचे पिक केले आहे. सदर ऊस पीक अर्जदार यांनी बेकायदेशीररित्या स्वत:चे नावे कागल येथील कारखान्यास चुकीचा व खोटा करार दाखवून पाठवले आहे. याबाबत जाबदार क्र.१ यांनी रितसर फौजदारी तक्रार दाखल केली असून ती प्रलंबित आहे. तसेच मे.दिवाणी न्यायालय, कोल्हापूर येथे कायम मनाई दावा दाखल केला असून, सदर दावा प्रलंबित आहे.

अर्जदार यांना त्यांच्या आत्म गरजेकरीता सदर मिळकत विक्री करायची होती व त्यासाठी अर्जदार यांनी त्यांच्या ओळखीचे जाबदार क्र.२ यांना त्याबाबत विचारणा केली होती. जाबदार क्र.१ यांना शेत जमिनीची आवश्यकता असल्याने, अर्जदार व जाबदार यांचेमध्ये रीतसर सदर जमीन खरेदी देण्याबाबत बोलणी झाली व तसा करार करण्यात आला होता. त्यावेळी सदर मिळकतीची रक्कम रु.बारा लाख ठरवण्यात आली होती. अर्जदार यांना सदर रक्कम मान्य नसल्याने खरेदीपत्रावेळी रु.तेरा लाख

करण्याबाबत तगादा लावला. म्हणून खरेदी पत्रातील मिळकतीचा मोबदला रु.तेरा लाख करण्यात आला व त्यासोबत लागणारा खर्च जाबदार क्र.१ यांनी रु.एक लाख पन्नास हजार अर्जदार यांना रोख स्वरुपात दिला आहे. सदर खरेदीपत्र नोंदणीवेळी अर्जदार व त्यांचा मुलगा हे हजर होते व त्यांनी सह्या केल्या आहेत. सदर मिळकतीचा ताबा जाबदार क्र.१ यांचेकडे होता. तो अर्जदार यांचेतर्फे प्रत्यक्ष देण्यात आला आहे. अर्जदार यांनी नमूद केल्यानुसार कोणताही व्याजाचा दर जाबदार क्र.१ यांनी कधीही व केव्हाही सांगीतला नव्हता.

अर्जदार यांना फक्त रु.पाच लाख मिळाले नसून खरेदी दस्तमधील कलम ४ मध्ये नमुद केलेनुसार रु.तेरा लाख फक्त पोहोच झाले आहेत. तसे अर्जदार यांनी सक्षम अधिकारी यांचेसमोर मान्य व कबुल केले आहे. सदर रक्कमा त्यांना कशाप्रकारे प्राप्त झाल्या, याबाबतही अर्जदार यांनी मान्य केले आहे. सदर रक्कमा अर्जदार यांना मिळाल्या नव्हत्या, तर त्याने त्याबाबत संबंधित अधिकारी यांचेसमोर तक्रार का केली नाही ? यावरुन सदर अर्जदार यांचा खोटारडेपणा स्पष्ट होत आहे. उर्वरित रक्कमेपैकी रक्कम रु.सहा लाख ही जाबदार क्र.१ यांनी बँकेमार्फत तबदिल केली आहे. तसेच दि.१३/०६/२०२२ रोजी रोख स्वरुपात देण्यात आलेल्या रक्कमेचा तपशीलही जाबदार क्र.२ यांचेकडे उपलब्ध आहे. खरेदीपत्राची फी भरण्यासाठी रक्कम रु.एक लाख पन्नास हजार हे जाबदार क्र.१ यांनी अधिकचे अर्जदार यांना दिले होते व अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे सदर व्यवहार रु.बारा लाख ऐवजी रु.तेरा लाख इतक्या रक्कमेचा करण्यात आला आहे.

यातील मिळकत अर्जदार यांची वहिवाटीस नसताना, जाबदार क्र.१ यांचे कब्जात असताना त्यांनी पिकवलेले ऊसाचे पिक हे स्वत:चे नावे बेकायदेशीर मार्गाने मिळकतीत जबरदस्ती घुसून चोरुन नेले आहे. अर्जदार हे जाबदार यांना सप्टेंबर २०२३ मध्ये भेटला नव्हता व नाही. अर्जदार याने त्याबाबत त्यांचेकडे कथित रक्कम कशी आली, त्यांनी जाबदार यांना केव्हा, कशाप्रकारे संपर्क केला, कोठे भेटला, कोणासोबत भेटला इ.बाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही. कथित कालावधीमध्ये जाबदार हे अर्जदार यांना भेटलेच नव्हते व तशी कोणतीही रक्कमेची मागणी त्यांचेकडे केलेली नव्हती.

अर्जदार यांचे कथनाप्रमाणे जाबदार यांनी कोणतीही व्याजाची रक्कम कधीही व केव्हाही अर्जदार यांचेकडे मागणी केली नव्हती. जाबदार क्र.१ हे कधीही व केव्हाही सराईत खाजगी सावकारी व्यवसाय करत नव्हते, तसेच जाबदार क्र.२ हे त्यांचे कधीही हस्तक म्हणून काम करीत नव्हते. अर्जदार यांनी रितसर तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात तात्काळ नोंदविणे आवश्यक होते. परंतु, अर्जदार हा त्याबाबत कोठेही बोलत नव्हता. त्यांच्या मोबाईल मधील कथित रेकॉर्डींग हे बनावट व खोटे असून, बोगस आहे . ते जाबदार यांचे नाही.

कायदेशीर मार्गाने नोंदवण्यात आलेल्या शेत मिळकतीच्या खरेदीपत्राने जाबदार क्र.१ हे अर्जदार यांचे मालकीच्या शेत मिळकतीचे मालक झाले असून त्यासाठी त्यांनी शेत मिळकतीचा होणार रीतसर कायदेशीर सर्वमान्य असा मोबदला देण्यात आला आहे. सदर व्यवहार अर्जदार यांना मान्य नसलेस त्यांनी योग्य ती न्यायालयीन कारवाई करणे आवश्यक आहे. जाबदार क्र.१ हे खाजगी सावकारी व्यवसाय करत नसल्याने, त्याचा रीतसर परवाना मागणी करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

अर्जदार हे जाबदार क्र.१ यांच्या शेत मिळकतीमध्ये दि.७/१२/२०२३ ते दि.०८/१२/२०२३ या तारखेव्यतिरिक्त कधीही आलेला नव्हता व नाही. अर्जदार यांनी खोटी कारणे नमूद करुन, त्यास धमकावण्यात आल्याचे व अडवणूक करण्यात आल्याचे खोटे कथन केले आहे. अर्जदार व इतर लोक यांनी जाबदार क्र.१ यांच्या शेत मिळकतीमधील कष्ट मशागत करुन पिकवलेला ऊस हा दांडगाव्याने शिरुन चोरुन नेण्यात आला आहे.

अर्जदार यांची शेत मिळकत पूर्ण व योग्य मोबदल्यात खरेदी केल्यानंतर अर्जदार यांना अधिक रक्कमेचा लोभ झाला असून जाबदार यांना त्रास देऊन रक्कम हडप करण्याच्या हेतूने तक्रार दाखल केली आहे. अर्जदार यांनी जाबदार क्र.१ यांनी पिकवलेले ऊसाचे पिक हे ते परगांवी वास्तव्यास असल्याचा गैर फायदा घेऊन परस्पर कारखान्यास विना अधिकाराने चोरुन नेले आहे. जाबदार क्र.१ यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला होता. परंतु तेथे कायदेशीर कारवाई सुरु केली नसल्याने, मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचेसमोर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३९/२०२४ प्रमाणे दाखल केला असून , तो प्रलंबित आहे. तसेच मे.दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कोल्हापूर येथे अर्जदार यांच्या गैरकृत्याबाबत कायम मनाईसाठी व नुकसान भरपाईसाठी दावा दाखल केला आहे. सदर दाव्याचा क्रमांक नियमित दिवाणी दावा क्रमांक १००/२०२४ असा असून, त्याकामी अर्जदार यांचेविरुध्द अंतरिम मनाई आदेश दि.२९/०६/२०२४ रोजीचे आदेशाने अर्जदार अगर तर्फे इसम यांना जाबदार

क्र.१ यांचे शेत मिळकत गट क्र.६५२/अ मधील मालकीचे क्षेत्रास हरकत अडथळा करु नये, म्हणून आदेश पारित करण्यात आलेला आहेत. अर्जदार याला शेत मिळकतीबाबत काहीही दाद मागणी करावयाची असल्यास, त्यास सक्षम दिवाणी न्यायालयात तशी दाद मागणी करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी त्यांचा तक्रार अर्ज हा गांधी नगर पोलीस ठाण्यास का देण्यात आला, याचे कारण समजत नाही. वरीलप्रमाणे खुलाश्यास्तव अर्जदार यांचा अर्ज फेटाळण्यात यावा.' असे म्हणणे जाबदार क्र.१ व २ यांचेवतीने सादर करण्यात आले.

अर्जदार यांचेतर्फे ॲड.श्री.कोळेकर यांनी दि.०७/१०/२०२४ रोजी लेखी युक्तीवाद सादर केला. सदर युक्तीवादामध्ये अर्जदार यांच्या मुळ अर्जातील मुद्यांव्यतिरिक्त अधिकचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**<u>अर्जदार यांचेतर्फे अधिक म्हणणे :-</u>**

' वि.प. हे खाजगी सावकारी करत असलेने, अन्य गरजू लोकांकडून अशाच पध्दतीने करारपत्र, खरेदीपत्र दर्शविलेली आहेत. त्याबाबतची कागदपत्रे दि.१८/०९/२०२४ रोजी दाखल केली असून त्यामध्ये वि.प.नं.२ हाच मध्यस्थ व साक्षीदार म्हणून नमुद आहे. कथित सर्व व्यवहार हे बाजारभाव व सरकारी मुल्यांकनापेक्षा कमी मोबदलेची दर्शविले असून ताबा मुळ मालकांकडेच आहे. तसेच कथित व्यवहार करणेपुर्वी वर्तमानपत्रामध्ये कोणतीही जाहीर नोटीस व सर्च रिपोर्ट घेतलेचे दिसत नाही. प्रतिवादी क्र.१ ने केले सर्व व्यवहारामध्ये रक्कम मुख्यत्वे रोख असे नमुद असुन सावकारी व्याजावरुन वाद होऊन तो वाद मा.न्यायालयात गेलेला आहे. प्रतिवादी नं.१ चे सर्व कथित व्यवहारामध्ये न्यायालयात वाद दाखल होणेचे कारण काय, याचा खुलासा प्रतिवादी करत नाहीत.

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांनी किरकोळ क्रिमीनल अर्ज नं.१३९/२०२४ चे कामी सी.आर.पी.सी. कलम १५६(३) ची मागणी मान्य केली असती. याउलट मा.न्यायालयाने प्रतिवादी नं.१ हे प्रत्यक्ष जमिनीत ऊस केलेचा कोणताही पुरावा दाखल नसलेने, अर्ज फेटाळला आहे. तसेच रे.क.नं.१००/२०२४ चे कामी पारीत झालेला नि.५ वरील आदेश हा एकतर्फा असून तो रितसर वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करुन आव्हानीत केला आहे. ' सदर म्हणण्यासोबत मा.न्यायालय, कोल्हापूर यांचे आदेश, श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना, कागल यांचेकडील पावत्या तसेच कारखान्यांनी अर्जदार यांचे खातेवर वर्ग केलेल्या रक्कमेची पावती तसेच लक्ष्मी पाणीपुरवठा मर्या.हलसवडे या संस्थेस अर्जदार यांनी पाणीपट्टी आकारणीची केलेल्या कपातीची पावती सादर केली.

अर्जदार व जाबदार यांनी सादर केलेले म्हणणे व त्याअनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे पाहता खालील बाबी निदर्शनास येतात.

**<u>निरीक्षण व अनुमान :-</u>**

१. अर्जदार यांनी सादर केलेला पेन ड्राईव्ह बाबत दृष्टी फॉरेन्सिक यांनी दिलेल्या अहवालामध्ये सदर पेन ड्राईव्ह अधिकृत असून त्यामध्ये बदल अथवा छेडछाड करणेत आलेली नाही, असे मत नोंदविले आहे.

२. श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.कागल यांचेकडील दि.२८/१२/२०२३ रोजीच्या जमा पावतीने अर्जदार यांच्या नावे प्रिंटींग स्टेशनरी चे रु.१० जमा करणेत आले आहे.

३. श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.कागल यांचेकडील स्टेटमेंटवरुन दि.०७/१२/२०२३ व दि.०८/१२/२०२३ रोजी अर्जदार यांचे नांवे कारखान्याकडे ऊस आवक झालेचे दिसून येते.

४. श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.कागल यांचेकडील दि.२५/१२/२०२३ रोजीच्या खाते उता-यानुसार कारखान्याने अर्जदार यांचेकडील २३.८१४ टन ऊसाचे गाळप केलेले आहे.

५. श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.कागल कारखान्याकडील दि.१९/१२/२०२३ रोजीच्या ऊस नोंद दाखल्यानुसार मौजे हलसवडे गट नं.६५२ क्षेत्र ०.२५ आर मध्ये खोडवा पीक नोंद करणेत आले आहे.

६. जाबदार यांनी दिवाणी न्यायालय, कोल्हापूर येथे दाखल केलेल्या दावा क्र.१००/२०२४ मधील आदेशाविरुध्द अर्जदार यांनी जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे अपील दाखल केले आहे.

७. श्री लक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, हलसवडे यांचेकडील दि.०९/१०/२०२४ रोजीच्या दाखल्यानुसार मौजे हलसवडे, गट नं.६५२ करीता अर्जदार यांना त्यांचे खोडवा ऊसाकरीता पाणी देण्यात आलेले आहे.

या कार्यालयाकडे दाखल असलेला पेन ड्राईव्ह मधील संभाषण व दृष्टी फॉरेन्सिक कडील लिखित अहवाल हा एकच आहे. सदर अहवाल पाहता झालेल्या व्यवहारामध्ये व्याजाच्या रक्कमेचा उल्लेख आलेला आहे. परंतु, संभाषणातील आवाज हे संबंधित व्यक्तीचेचे आहेत, हे सिध्द होत नाही. त्याबाबत मा.न्यायालयाचे आदेशाने फॉरेन्सिक खात्याकडून आवाजाचे परिक्षण झालेस अंतिम सत्य सिध्द होऊ शकते.

तसेच प्रस्तुत प्रकरणातील मिळकत ही अर्जदार श्री.नागोंडा पाटील यांचे ताब्यात असलेचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी जमीन विकत घेतली असेल, तर ती त्याचक्षणी स्वत:च्या ताब्यात घेणे आवश्यक होते. अर्जदार यांनी ऊस पिकाची लागवड करुन पीक तयार झाल्यानंतर अथवा ऊस कारखान्याला गेल्यावर त्याबाबत गैरअर्जदार यांनी तक्रार करणे, ही बाब योग्य वाटत नाही.

यावरुन, श्री.बाबासो पारीसा लबाजे रा.कसबा सांगाव, ता.कागल हे अवैध सावकारीचा व्यवहार करीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द होते.

कृपया सदरचा अहवाल अवलोकनी यावा, ही विनंती.

(प्रेमदास राठोड)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता.करवीर, जि.कोल्हापूर

[पान नं. १ ते ५]
TRUE COPY

सहाय्यक निबधक
सहकारी संस्था, ता. करवीर
जि. कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| फौजदारी नक्कल रजिस्टर क्रमांक | 5460 / 25 | २०२५ | |
| अर्जदाराचे नाव | ॲड. म्न. पी. रणदिवे | २०२५ | अ. नं. 3 |
| अर्ज दिलेली तारीख | 16 / 12 | २०२५ | |
| अर्ज पुर्ण झालेची तारीख | 22 / 12 | २०२५ | |
| अर्ज समज दिली तारीख | 18 / 12 | २०२५ | |
| नक्कल तयारी तारीख | 22 / 12 | २०२५ | सहा. अधिक्षक |
| नक्कल दिली तारीख | 22 / 12 | २०२५ | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, कोल्हापूर |
| निशाणी क्रमांक | एकूण पाने | दर | रुपये |
| B. A. R.R. | 14 | 4 | 56 =00 |

AL MAGISTRATE
न्यायदंडाधिकारी